

मोडनिंब : महाडिक महाविद्यालयातून पहिला संशोधक होण्याचा मान मिळवलेले प्रा. राजेंद्र बावळे यांचा सत्कार करताना संस्था उपाध्यक्ष व्ही. के. पाटील, डॉ. वामन जाधव आदी.

# प्रा. बावळे यांना पीएच.डी.

**मोडनिंब : प्रतिनिधी**

येथील महाडिक महाविद्यालयातील संशोधन केंद्रातून पहिली पीएच.डी. मिळविण्याचा मान सध्या महात्मा फुले महाविद्यालय पिंपरी चिंचवड येथे अधिव्याख्याता म्हणून कार्यरत असलेले प्रा. राजेंद्र बावळे यांनी मिळविला आहे.

त्यांनी '१९७५ नंतरच्या अभिनेत्यांची चरित्रे' या विषयावर पीएच.डी.साठी संशोधन केले. डॉ. वामन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे संशोधन केले आहे. संस्थेचे उपाध्यक्ष व्ही.के. पाटील यांच्या हस्ते बावळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. मुत्तावली, एजाज तांबोळी, संजय गायकवाड आदी उपस्थित होते.

दै. पुण्यनगरी - २६/७/२०१८

# प्रा. बावळे यांनी मिळविला 'महाडिक'मधून पहिली पीएच.डी. मिळविण्याचा मान



**मोडनिंब / प्रतिनिधी**

येथील महाडिक महाविद्यालयातील संशोधन केंद्रातून पहिली पीएच.डी. मिळविण्याचा मान सध्या म.फुले महाविद्यालय पिंपरी चिंचवड येथे अधिव्याख्याता म्हणून कार्यरत असलेले प्रा. राजेंद्र बावळे यांनी मिळविला आहे. त्यांनी नुकताच '१९७५ नंतरच्या अभिनेत्यांची चरित्रे' या विषयावर पीएच. डी. साठी संशोधन केलेले आहे. महाडिक महाविद्यालयातील डॉ.वामन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हे मार्गदर्शनपर संशोधन केलेले आहे. त्याबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष व्ही.के.पाटील यांच्या हस्ते प्रा.बावळे यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी बहिस्थ परीक्षक डॉ. मुत्तावली, डॉ. ईजाज तांबोळी, डॉ. संजय गायकवाड हेही उपस्थित होते.

पुण्य नगरी
HighLights
शुक्रवार, ३ फेब्रुवारी २०१७ सोलापूर

# 'महाडिक'च्या वतीने ५ फेब्रुवारी रोजी स्नेहमेळावा

मोडनिंब / प्रतिनिधी
येथील महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालयातील सर्व माजी विद्यार्थी आणि आजी पालकांचा रविवार, ५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार, पालकांशी सुसंवाद आणि महाविद्यालयाच्या सुधारणेबाबत विचारविनिमय करण्यात येणार आहे. या स्नेहमेळाव्यास संस्थेचे अध्यक्ष मनोहर डोंगरे, उपाध्यक्ष व्ही. के. पाटील, सचिव शिवाजीराव पाटील यांच्यासह सर्व संचालक मंडळ उपस्थित राहणार आहे, असे प्राचार्य डी. के. शिंदे, हनुमंत पाटील यांनी कळविले आहे.

CamScanner

# परभणी जिल्हा
# पोलिस शिपाई भरती २०१७

पोलिस अधीक्षक परभणी यांचे आस्थापनेवरील पोलिस शिपाई यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे भरण्यात येणार आहेत. या बदलची सविस्तर माहिती www.mahapolice.gov.in व mahapolice.mahaonline.gov.in व parbhanipolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिद्ध करण्यात आली आहे.

उमेदवारास पोलिस अधीक्षक परभणी यांच्या आस्थपनेवरील पोलिस शिपाई या पदांसाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. अर्जासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क आकारण्यात येईल. पोलिस शिपाई पदांसाठी शारीरिक चाचणी पोलिस मुख्यालय परभणी येथे होणार आहे. अर्ज भरलेल्या दोन घटकांतील परीक्षेच्या दिनांक एकाच दिवशी आल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. त्यामध्ये बदल करता येणार नाही. पोलिस शिपाई पदासाठीची लेखी परीक्षा स्थळ या बाबत पात्र उमेदवारास नंतर स्वतंत्र किंवा दैनिक वृत्तपत्रातील जाहिरातीद्वारे कळविण्यात येईल.

टप्याटप्याने प्राप्त झालेल्या आवेदन अर्जावर प्रक्रिया करुन शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणीसाठी उमेदवारांना प्रवेशपत्र पाठविण्यात येणार आहेत. उमेदवारांनी सुरुवातीपासूनच अर्ज भरावेत.

उमेदवारांनी आवेदन अर्जात अचूक माहिती द्यावी. चुकीची माहिती दिल्यास उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. उमेदवारांची शारीरिक व लेखी चाचणीनंतर ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांचीच सर्व कागदपत्रे तपासण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांकडे योग्य कागदपत्रे नसतील तर तो अपात्र होईल. केवळ शारीरिक व लेखी चाचणीद्वारे निवड झाली म्हणून तो पात्र ठरणार नाही.

यावर्षी प्रथम शारीरिक मोजमाप, त्यानंतर मैदानी चाचणी व लेखी परीक्षा व तदनंतर तात्पुरती निवड यादी जाहीर व तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांचीच कागदपत्रे पडताळणी करण्यात येणार आहे. व नंतर पात्र उमेदवारांची अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल. जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

जाहिरातीतील नमुद केलेल्या रिक्त पदांची संख्या/ पूर्ण पदे भरण्याबाबत शासन आदेशाच्या अधीन असेल. पद संख्या कमी झाल्यास उमेदवारास निवडी बाबत कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

स्वाक्षरीत

(विश्व पानसरे)

प्र.पोलिस अधीक्षक, परभणी.

लोकमत - २४/२/१८

...ghala City Municipal Corpor..., Nande...

# हिंगोली जिल्हा पोलीस शिपाई भरती-२०१७

पोलीस अधीक्षक, हिंगोली यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे भरण्यात येणार आहे. ह्या बद्दलची सविस्तर माहिती www.mahapolice.gov.in व mahapolice.mahaonline.gov.in व www.hingolipolice.org या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहिती करीता प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- उमेदवारास पोलीस शिपाई पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. अर्जासाठी लागू असलेले परीक्षा शुल्क आकारण्यात येईल.
- पोलीस शिपाई पदासाठी मैदानी चाचणी व लेखी परीक्षा कोठे होईल याचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र जाहिरातीसोबत देण्यात आलेले आहे. त्यामध्ये बदल झाल्यास उमेदवारांना कळविण्यात येईल.
- टप्याटप्याने प्राप्त झालेल्या आवेदन अर्जांवर प्रक्रिया करून शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणीसाठी उमेदवारांना प्रवेश पत्र पाठविण्यात येणार आहेत. म्हणून उमेदवारांनी सुरूवातीपासूनच अर्ज करावेत.
- उमेदवारांनी आवेदन अर्जात अचूक माहिती द्यावी. चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्यावर रद्द होईल. उमेदवारांची शारिरीक व लेखी चाचणीनंतर ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांचीच सर्व कागदपत्रे तपासण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांकडे योग्य कागदपत्रे नसतील तर तो अपात्र होईल. केवळ शारिरीक व लेखी चाचणीद्वारे निवड झाली म्हणून तो पात्र ठरणार नाही.
- या वर्षी प्रथम शारिरीक मोजमाप, त्यानंतर मैदानी चाचणी व लेखी परिक्षा व तद्नंतर तात्पुरती निवड यादी जाहिर व तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांचीच कागदपत्रे पडताळणी करण्यात येणार आहे व नंतर पात्र उमेदवारांची अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल.
- जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
- जाहिरातीतील नमूद केलेल्या रिक्त पदांची संख्या/पूर्ण पदे भरण्याबाबत शासन आदेशाच्या अधीन असेल. पद संख्या कमी झाल्यास उमेदवारास निवडी बाबत कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

स्वाक्षरित/-
(अशोक मोराळे)
पोलीस अधीक्षक, हिंगोली

---

# सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०१७

## राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक १२

समादेशक राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक १२ यांचे आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे भरण्यात येणार आहेत. ह्या बद्दलची सविस्तर माहिती www.mahapolice.gov.in व https://mahapolice.mahaonline.gov.in व www.maharashtrasrpf.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई (पुरुष) (सेवाप्रवेश) नियम-२०१२ व त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या तरतुदी सशस्त्र पोलीस शिपाई पदास लागू राहतील.
- उमेदवारास (१) पोलीस आयुक्त/ पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई/ बॅन्डस्मन, (२) लोहमार्ग पोलीस बलातील पोलीस शिपाई, (३) राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई/ बॅन्डस्मन व (४) कारागृह विभागातील कारागृह शिपाई अशा विविध पदांसाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क आकारण्यात येईल. विविध पदांसाठी विविध ठिकाण शारीरीक चाचणी/ लेखी परीक्षा होणार आहे. त्याची सुची जाहिरातीसोबत जोडली आहे. अर्ज भरलेल्या दोन घटकांतील परीक्षेच्या तारखा एकाच दिवशी आल्यास त्याची जबाबदारी ह्या कार्यालयाची राहणार नाही. त्यामध्ये बदल करता येणार नाही.
- वरील चार प्रकारच्या पदांसाठी मैदानी चाचणी व लेखी परीक्षा कोठे होईल याचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र जाहिरातीसोबत देण्यात आलेले आहे. त्यामध्ये बदल झाल्यास त्याबाबत उमेदवारांना कळविण्यात येईल.
- टप्प्याटप्प्याने प्राप्त झालेल्या आवेदन अर्जावर प्रक्रिया करून शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणीसाठी उमेदवारांना प्रवेशपत्र पाठविण्यात येणार आहेत. म्हणून उमेदवारांनी सुरूवातीपासूनच अर्ज भरावेत.
- उमेदवारांनी आवेदन अर्जात अचूक माहिती द्यावी, चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. उमेदवारांची शारीरीक व लेखी चाचणीनंतर ज्या उमेदवारांची निवड होईल. त्यांचीच सर्व कागदपत्रे तपासण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांकडे योग्य कागदपत्रे नसतील तर तो अपात्र होईल. केवळ शारीरीक व लेखी चाचणीद्वारे निवड झाली म्हणून तो पात्र ठरणार नाही.
- यावर्षी प्रथम शारिरीक मोजमाप, त्यानंतर मैदानी चाचणी व लेखी परीक्षा व तद्नंतर तात्पुरती निवडयादी जाहिर व तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांचीच कागदपत्रे पडताळणी करण्यात येणार आहे व नंतर पात्र उमेदवारांची अंतिम निवडयादी प्रसिद्ध करण्यात येईल.
- जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होवू शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
- जाहिरातीतील नमूद केलेल्या रिक्त पदांची संख्या/ पुर्ण पदे भरण्याबाबत शासन आदेशाच्या अधीन असेल. पद संख्या कमी झाल्यास उमेदवारास निवडीबाबत कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

लोकमत २४/२/१८

स्वाक्षरीत/-
(नामदेव एम. मिट्टेवाड)
समादेशक,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १२ हिंगोली

CamScanner

## संक्षिप्त

# महिलांचा प्रत्येक ठिकाणी सन्मान व्हावा : पोलिस निरीक्षक बल्लाळ

**मोडनिंब (प्रतिनिधी) :** प्रत्येक कार्यालयाच्या ठिकाणी महिलांचा आदर राखणे गरजेचे आहे.

प्रत्येक कार्यालयाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ टाळण्यासाठी महिला तक्रार निवारण व संरक्षण समिती स्थापन करणे अनिवार्य आहे, असे मत टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बल्लाळ यांनी महाडिक महाविद्यालयात व्यक्त केले.



**मोडनिंब : महिला तक्रार निवारण कार्यशाळेत बोलताना पो.नि. बल्लाळ.**

यावेळी महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा डॉ. सुरैया शेख यांनी प्रास्ताविकात लैंगिक छळविरोधी कायद्याची पार्श्वभूमी, समितीच्या कामाचे स्वरूप, कायद्यातील महत्त्वाच्या व्याख्या, तक्रारीची चौकशी या संदर्भात माहिती दिली. कार्यक्रमास महिला तक्रार निवारण समितीच्या सुरेखा पाटील, महिला आघाडीच्या शर्मिला कोळी, संगीता जाधव, प्रा. वंदना पवार आदी उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य दादासाहेब शिंदे म्हणाले की, महिला संरक्षण समितीकडे आलेली प्रत्येक तक्रार गोपनीय राहिल. संबंधित तक्रारीची तात्काळ दखल घेऊन तिचा निपटारा केला जाईल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. शेख यांनी मानले.

# परभणी जिल्हा

# पोलिस शिपाई भरती २०१७

पोलिस अधीक्षक परभणी यांचे आस्थापनेवरील पोलिस शिपाई यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे भरण्यात येणार आहेत. या बदलची सविस्तर माहिती www.mahapolice.gov.in व mahapolice.mahaonline.gov.in व parbhanipolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिद्ध करण्यात आली आहे.

उमेदवारास पोलिस अधीक्षक परभणी यांच्या आस्थपनेवरील पोलिस शिपाई या पदांसाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. अर्जासाठी स्वतंत्र परीक्षा शुल्क आकारण्यात येईल. पोलिस शिपाई पदांसाठी शारीरिक चाचणी पोलिस मुख्यालय परभणी येथे होणार आहे. अर्ज भरलेल्या दोन घटकांतील परीक्षेच्या दिनांक एकाच दिवशी आल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. त्यामध्ये बदल करता येणार नाही. पोलिस शिपाई पदासाठीची लेखी परीक्षा स्थळ या बाबत पात्र उमेदवारास नंतर स्वतंत्र किंवा दैनिक वृत्तपत्रातील जाहिरातीद्वारे कळविण्यात येईल.

टप्याटप्याने प्राप्त झालेल्या आवेदन अर्जावर प्रक्रिया करुन शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणीसाठी उमेदवारांना प्रवेशपत्र पाठविण्यात येणार आहेत. उमेदवारांनी सुरुवातीपासूनच अर्ज भरावेत.

उमेदवारांनी आवेदन अर्जात अचूक माहिती द्यावी. चुकीची माहिती दिल्यास उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. उमेदवारांची शारीरिक व लेखी चाचणीनंतर ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांचीच सर्व कागदपत्रे तपासण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांकडे योग्य कागदपत्रे नसतील तर तो अपात्र होईल. केवळ शारीरिक व लेखी चाचणीद्वारे निवड झाली म्हणून तो पात्र ठरणार नाही.

यावर्षी प्रथम शारीरिक मोजमाप, त्यानंतर मैदानी चाचणी व लेखी परीक्षा व तद्नंतर तात्पुरती निवड यादी जाहीर व तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांचीच कागदपत्रे पडताळणी करण्यात येणार आहे. व नंतर पात्र उमेदवारांची अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल. जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

जाहिरातीतील नमुद केलेल्या रिक्त पदांची संख्या/ पूर्ण पदे भरण्याबाबत शासन आदेशाच्या अधीन असेल. पद संख्या कमी झाल्यास उमेदवारास निवडी बाबत कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

स्वाक्षरीत

(विश्व पानसरे)

प्र.पोलिस अधीक्षक, परभणी.

लोकमत - २४/१/१८

## महाडिक कॉलेजमध्ये माजी विद्यार्थी मेळावा

**मोडनिंब** । मा.ह.महाडिक महाविद्यालय, मोडनिंब येथे माजी विद्यार्थ्यांचा मेळावा संपन्न झाला. यावेळी [illegible] केले. प्राचार्य डॉ. दादासाहेब शिंदे, कर्मी अरुण कुलकर्णी तसेच माजी विद्यार्थी अमित कोळी, जगन्नाथ रणदिवे, सागर सुर्वे यांनी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी निवृत्ती सुर्वे, शिवाजी पाटील, सौदागर साळुंके, सुरय्या शेख, हणुमंत पाटील, सुभाष गायकवाड, दत्तात्रय महाडिक, राजू गिड्डे, माजी विद्यार्थी उपस्थित होते.

सोलापूर, गुरुवार, २ फेब्रुवारी २०१७ । ३

दिव्य मराठी

## मोडनिंबमध्ये विविध कार्यक्रमांनी मतदान दिन उत्साहात साजरा



**मोडनिंब** । मोडनिंब (ता. माढा) येथे मतदान दिन साजरा करण्यात आला. मा.ह.महाडिक महाविद्यालय, संगनबसवेश्वर कन्या प्रशाला, उमा विद्यालय या ठिकाणी निबंध, चित्रकला, रांगोळी व सायकल स्पर्धा घेण्यात आल्या. याप्रसंगी महाडिक महाविद्यालयामध्ये प्रांताधिकारी मारुती बोरकर यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी सायकल रॅली काढली. यावेळी तहसीलदार सदाशिव पडदुणे, मंडल अधिकारी सुभाष बदे, तलाठी चंद्रकांत नावडे, प्राचार्य दादासाहेब शिंदे, प्राचार्य राजेंद्र म्हमाणे, प्राचार्य अशोक गोवे, प्रा.सुहास पाटील, आर.एस.पाटील, संगीता सुर्वे, साधना पाटील, शेखर सुर्वे, अमोल चव्हाण उपस्थित होते.

MY सोलापूर २ पुढारी | बुधवार ३ मे २०१७

# कॉलेज कर्मचारी युनियनच्या कार्याध्यक्षपदी राजेंद्र गिड्डे

मोडनिंब (प्रतिनिधी) : सोलापूर विद्यापीठ संलग्न कॉलेज कर्मचारी युनियनच्या कार्याध्यक्षपदी येथील महाडिक महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक राजेंद्र शंकर गिड्डे यांची निवड करण्यात आली. पदाधिकारी निवडीची सभा वडाळा येथे माऊली महाविद्यालयात अध्यक्ष राजेंद्र गोटे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी सरचिटणीसपदी अजित संगवे सोलापूर, उपाध्यक्षपदी दत्ता भोसले सोलापूर, व हनुमंत खपाले पंढरपूर, खजिनदार शेख ए. जी. सोलापूर आदींची निवड करण्यात आली आहे. सदर निवडी ह्या सन २०१७-२०२२ या कालावधीसाठी आहेत.

CamScanner

# विद्यापीठाच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

**सोलापूर / प्रतिनिधी**

सोलापूर विद्यापीठाने शैक्षणिक सत्र चालू होण्यापूर्वीच चालू वर्षी होणाऱ्या विद्यापीठाच्या ऑक्टोंबर - २०१७ आणि मार्च - २०१८ च्या परिक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. विद्यापीठीय सत्रनिहाय सर्व विद्याशाखा अभ्यासक्रमाचे कच्चे वेळापत्रक जाहीर करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांना परिक्षेचे नियोजन करता येणार आहे.

माहे ऑक्टोंबर / नोव्हेंबर २०१७ मधील परिक्षा २४ ऑक्टोंबर, बी.एस्सी या वर्गाच्या परिक्षा ३१ ऑक्टोंबर पासून, एम.ए. / एम.कॉम / एम. एस्सी च्या परिक्षा १८ नोव्हेंबर पासून, अभियांत्रिकी वर्गाच्या परिक्षा २८ नोव्हेंबर पासून होणार आहे. तसेच मार्च / एप्रिल २०१८ मधील बी.कॉम. / बी.ए या वर्गाच्या परिक्षा २१ मार्च २०१८ पासून, बी.एस्सी या वर्गाच्या परिक्षा २७ मार्च २०१८ पासून एम.ए. / एम. कॉम. / एम.एस्सी या वर्गाच्या परिक्षा १८ एप्रिल २०१८ आणि अभियांत्रिकी या वर्गाच्या ३ मे २०१८ पासून परिक्षा सुरू होणार आहेत. सोलापूर विद्यापीठाच्या परिक्षा विभागाच्या वतीने विविध प्रयोग करून राबवले जात असून सोलापूर विद्यापीठाच्या चालू शैक्षणिक वर्षामध्ये होणाऱ्या परिक्षाचे नियोजन केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

पुण्यनगरी
3/4/18

श

लातुरात
ले. या
ख ५०
होईल,

ापना
स्थापना
र्मादाय
आला
रणांना
ीसाठी
ांतील
चे डॉ.

आरक्षण
आरक्षण
तले.

सोलापूर, शुक्रवार, दि. २४ नोव्हेंबर २०१७ | ३

# सुभाष खिलारे यांना पीएच.डी. पदवी प्रदान



कासेगाव : पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथील प्रा. सुभाष विठ्ठल खिलारे यांना सोलापूर विद्यापीठाची पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी मराठी विषयात '१९७५ नंतरच्या दलित कथेतील स्त्री' या विषयावर प्रबंध सादर केला होता. त्यांना मोडनिंब येथील मा. ह. महाडिक महाविद्यालयातील प्रा. डॉ. वामन जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्रा. डॉ. विजया तेलंग, प्राचार्य डॉ. शिंदे, डॉ. सुहास पुजारी, डॉ. महादेव देशमुख, डॉ. चांगदेव कांबळे, प्रा. औदुंबर जाधव, प्रा. दत्ता खिलारे, डॉ. शकील शेख, डॉ. सारीपुत्र तुपेरी, डॉ. देविदास गायकवाड, डॉ. बावळे, राहुल लोंढे यांनी अभिनंदन केले.

# मोडनिंबमध्ये सुरैय्या शेख यांचा सत्कार



लोकमत न्यूज नेटवर्क 29/11/17.

मोडनिंब : येथील मा. ह. महाडिक महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. सुरैय्या शेख यांची सोलापूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीवर निवड झाली. त्यानिमित्त त्यांचा आ. दत्तात्रय सावंत व संस्थेचे सचिव शिवाजी पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मोहन मोरे, बैरागवाडीचे सरपंच मारुती माळी, जाधववाडीचे सरपंच गणेश महाडिक, उपसरपंच संगीता चव्हाण, विश्वस्त निवृत्ती सुर्वे, बंडू आदलिंगे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

CamScanner

। शिलम् परम् भूषणम् ।







सस्नेह निमंत्रण

श्रीमंत सौ. उमाबाईसाहेब पटवर्धन स्मारक संस्था, मोडनिंब संचलित

## श्री उमा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय (शेती, तांत्रिक, किमान कौशल्य व कला)

## मा.ह. महाडीक कला व वाणिज्य महाविद्यालय, मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापू

यांसी सस्नेह नमस्कार

सोमवार दि. १८.१२.१७ रोजी सकाळी १० वा. आमच्या संस्थेचे माजी अध्यक्ष **ॲड. मा.ह. महाडीक (तात्या)** यांच्या १० व्या स्मृतिदिनानिमित्त काव्यश्री खुल्या जिल्हास्तरीय काव्यवाचन स्पर्धा व श्री उमा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय अंतर्ग **रांगोळी स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन व क्रीडा स्पर्धा** आणि **मा. शरदचंद्रजी पवारसाहेब** यांच्या ७७ व्या वाढदिवसानिमित्त **शरदश्री खुल्या जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा** व **वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा** व उमा विद्यालयाचा माजी विद्यार्थी **यशवंतसिंह संतोष लोकरे** महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघात निवड झाल्याबद्दल जाहीर सत्कार खालील मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न होत आहे.

**कार्यक्रमाचे अध्यक्ष : मा.श्री. दीपक (आबा) साळुंखे-पाटील, अध्यक्ष, रा.कॉं. पार्टी सोलापूर जिल्ह**

### प्रमुख उपस्थिती

**मा.आ.श्री. बबनरावजी शिंदे**
अध्यक्ष, विठ्ठलराव शिंदे स.सा. कारखाना

**मा.आ.श्री. विनायकराव पाटील**
माजी आमदार, माढा विधानसभा

**मा.श्री. भारत (आबा) शिंदे**
जि.प. सदस्य, सोलापूर

**मा.श्री. सत्यनारायण गिड्डे**
सरपंच, ग्रा.पं. मोडनिंब

**मा.श्री. नागनाथ (नाना) ओहोळ**
उपसरपंच, ग्रा.पं. मोडनिंब

**मा.आ.श्री. धनाजी (तात्या) साठे**
अध्यक्ष, कूर्मदास स.सा. कारखाना

**मा.श्री. पांडुरंग (आण्णा) पाटील**
व्हा. चेअरमन, विठ्ठलराव शिंदे स.सा. कारखाना

**मा.ॲड. बाळासाहेब संपतराव पाटील**
सदस्य, जनरल बॉडी रयत शिक्षण, सातारा

**मा.श्री. कैलास (दादा) तोडकरी**
अध्यक्ष, माढा ता. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी

**मा.श्री. कुरण (आण्णा) गिड्डे**
माजी सरपंच, ग्रा.पं. मोडनिंब

**मा.श्री. द.मा. महाडीक (सर)** माजी प्राचार्य, श्री उमा विद्यालय

### आयोजक विनित

**मा. मंगल उर्फ शि.चं. पाटील**
सचिव

**मा. व्ही.के. पाटील**
उपाध्यक्ष

**मा. मनोहरभाऊ डोंगरे**
अध्यक्ष

मा.श्री. बाळासाहेब भा. पाटील, मा.श्री. सिध्देश्वर करंडे, मा.श्री. ॲड. वसंतराव महाडीक, मा.श्री. राजेशआण्णा पा
मा.श्री. भारत तोडकरी, मा.श्री. निवृत्ती सोपान सुर्वे, मा. वि.श्री. अजुकाका मोरे, मा.वि.श्री. सुभाषकाका शहा

## श्रीमंत सौ. उमाबाईसाहेब पटवर्धन स्मारक संस्था, मोडनिंब

मा.प्राचार्य आर.एस. पाटील, पर्यवेक्षक मा.श्री. मांदे डी.बी., मा. प्राचार्य डॉ. दादासाहेब शिंदे
सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर, कर्मचारी आणि विद्यार्थीवृंद श्री उमा शैक्षणिक संकुल, मोडनिंब

CamScanner

# विद्यार्थ्यांपुढे नवीन आदर्श निर्माण करावेत : साळुंखे-पाटील



पारितोषक वितरण समारंभात बोलताना माजी आ. दीपक साळुंखे-पाटील. सोबत बसलेले जिल्हा दूध संघाचे उपाध्यक्ष मनोहर डोंगरे, जि.प. सदस्य भारत शिंदे, सचिव शिवाजी पाटील, ॲड. बाळासाहेब पाटील, मोहन मोरे आदी.

**मोडनिंब / प्रतिनिधी**

राजकीय व्यक्तींना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावण्यापेक्षा माढा तालुक्यातीलच शासकीय सेवेत वरिष्ठ अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या कर्तृत्ववान व्यक्तीला बोलवून विद्यार्थ्यांपुढे नवीन आदर्श निर्माण करण्यात यावा, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दीपक साळुंखे-पाटील यांनी व्यक्त केले. मोडनिंब येथील श्री उमा विद्यालयात माजी कृषीमंत्री शरद पवार यांचा वाढदिवस आणि ॲड. मा.ह. महाडिक पुण्यतिथीनिमित्त आयोजित विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उमाबाईसाहेब पटवर्धन आणि सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

पुढे बोलताना साळुंखे-पाटील पुढे म्हणाले की, माढा तालुका हा अनेक वरिष्ठ पातळीवरील अधिकारी निर्माण करणारा तालुका आहे. येथील बऱ्याच गावांनी मोठमोठे अधिकारी निर्माण केलेले असून, या अधिकाऱ्यांनीही आपल्या कार्यकर्तृत्वावर राज्यात माढा तालुक्याचे नाव रोशन केलेले आहे. त्यांचा आदर्श या विद्यार्थ्यांसमोर आल्यास विद्यार्थ्यांमधूनही असे अधिकारी पद मिळविण्याची जिद्द निर्माण होईल.

या कार्यक्रमात महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झालेल्या यशवंतसिंह लोकरे, चित्रकार युगंधर साळुंखे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास जि.प. सदस्य भारत शिंदे, रयत शिक्षण संस्थेचे सदस्य बाळासाहेब पाटील, कूर्मदास कारखान्याचे प्रमुख दादासाहेब साठे, सरपंच सत्यनारायण गिड्डे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष कैलास तोडकरी, विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याचे उपाध्यक्ष पांडुरंग पाटील, रिपाइंचे नागनाथ ओहोळ, गणेश महाडिक, प्रा. गोवे, प्रा. काटकर आदी उपस्थित होते. सर्व प्रमुख पाहुण्यांचा संस्था अध्यक्ष मनोहर डोंगरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्था सचिव शिवाजी पाटील, प्राचार्य दादासाहेब शिंदे, मुख्याध्यापक रमेश पाटील, प्रा. सुहास पाटील, दादासाहेब साठे, प्रा.डॉ. सौदागर साळुंखे, डॉ. सुरय्या शेख आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास संस्थेचे सदस्य ॲड. वसंत महाडिक, राजेश पाटील, निवृत्ती सुर्वे, भारत तोडकरी, माजी प्राचार्य दत्तात्रय महाडिक आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यापीठाच्या सिनेटवर निवड झाल्याबद्दल डॉ. सुरय्या शेख आणि डॉ. वामन जाधव यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोपट भांगे यांनी केले. तर आभार प्राचार्य आर.एस. पाटील यांनी मानले.

CamScanner

## शतक महोत्सवाकडे

# वाटचाल

मोडनिंब संस्थानचे राजे पटवर्धन यांनी आपल्या दिवंगत पत्नीची स्मृती म्हणून मोडनिंबमधील प्रतिष्ठित नागरिकांना बरोबर घेऊन श्री. उमा विद्यालयाची स्थापना केली. संस्थेच्या २०१९ मध्ये शतक महोत्सव साजरा होत आहे. संस्थेकडून सर्व शाखांना नवीन रूप देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. त्यानिमित्त...

# शिक्षण

प्रा. जयंत समुद्र



मोडनिंब हे कुर्डुवाडी - पंढरपूर लोहमार्गावरचे गाव! बरोबर ९८ वर्षांपूर्वी मोडनिंब संस्थानचे राजे पटवर्धन यांनी आपल्या दिवंगत पत्नीची स्मृती म्हणून मोडनिंबमधील प्रतिष्ठित नागरिकांना बरोबर घेऊन श्री. उमा विद्यालयाची स्थापना केली! अवघे १५ विद्यार्थी असताना सुरू झालेलं हे विद्यालय सर्व जातीधर्माच्या मुला-मुलींसाठी खुलं होत! केवळ देगणीवर सुरू झालेलं व चालवले जात असलेलं हे विद्यालय आसपासच्या चार किलोमीटर गावातील विद्यार्थ्यांच्या भवितव्याचं साधन बनलं! जशी संख्या वाढू लागली तसे त्याला अधिकृत स्वरूप देण्यासाठी संस्थेची स्थापना झाली. या संस्थेची पहिली घटना साहित्यसम्राट (कै.) न. चिं. केळकर यांनी लिहिली व संस्थेचं नाव झालं 'श्रीमंत सौ. उमाबाईसाहेब पटवर्धन स्मारक संस्था! (कै.) पटवर्धन राजे, (कै.) सखाराम साठे, (कै.) हरिराव महाडिक, ॲड. शहा, दफ्तरदार वकील अशा त्यावेळच्या समाजधुरिणांनी तनमनधनाने संस्थेच्या प्रगतीस हातभार लावला, विद्यार्थ्यांना निवासी शिक्षणाची सोय होण्यासाठी १९२५ मधे वसतिगृह सुरू झाले. (कै.) सोहोनी सर, (कै.) भाटवडेकर सर व संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष ॲड. मा. ह. महाडिक यांचे नेतृत्वाखाली विद्यालयाची चौफेर प्रगती झाली.

सन १९७५ मधे कनिष्ठ महाविद्यालय, १९८० मधे तांत्रिक विद्यालय, १९९२ मधे व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम तर १९९५ मधे वरिष्ठ महाविद्यालयाची सुरवात झाली. १५ विद्यार्थी असताना सुरू झालेले हे ज्ञानदानाचं रोपटं आज पाचवी ते पदवीपर्यंत शिक्षण देत आहे! सन २०१९ मधे संस्थेचा शतकमहोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याचा मानस असून संस्थेचा सर्व शाखांना नवीन रूप देण्याचा संकल्प असून यासाठी आखणी करण्याचे काम संस्थेचे अध्यक्ष मनोहरभाऊ डोंगरे, उपाध्यक्ष व्ही. के. पाटील, सचिव शिवाजीराव पाटील व सर्व विश्वस्त मंडळ करत असून संस्थेच्या शतक महोत्सवासाठी सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली आहे!...

CamScanner